सोमवार दि.१७ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१५२ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

## धस–मुंडे भेटीने कुठलाही फरक पडत नाही

# यावरून राजकारण होत असेल,तर ते लोकशाही मध्ये योग्य नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जळगाव (वृत्तसंस्था)**

दोन दिवसांपूर्वीच सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्यात बैठक झाल्याचे वृत्त माध्यमांत झळकल्यानंतर विरोधकांकडून सुरेश धस यांच्यावर जोरदार हल्लाबोल करण्यात आला. मात्र, या भेटीने कुठलाही फरक पडत नाही, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी दिली. सुरेश धस आरोपींना शिक्षा झालीच पाहिजे, या हेतूने काम करत आहेत. मात्र, काही लोकांच्या पोटात दुखते, त्यामुळे ते यावर टीका करतात, असेही ते म्हणाले. ते जळगावमध्ये माध्यमांशी बोलत होते.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर भाजपचे आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे तसेच वाल्मीक कराड यांच्यावर चांगलाच निशाणा साधला आहे. धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यात मतभेद असले तरी देखील सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. त्यामुळे आता हा वाद निवळला आहे का? असा सवाल अनेकांना पडला आहे. भेटीवर विरोधक चांगेलच आक्रमक झाले आहेत. तर सत्ताधारी आपली बाजू मांडत आहेत. त्यातच आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या भेटीवर आपली पहिली प्रतिक्रिया दिली.

कोण कुणाला भेटले याच्यावर राजकारण होत असेल, तर ते लोकशाहीमध्ये योग्य नाही. लोकशाहीमध्ये संवाद हा सुरू राहिला पाहिजे, असे मुख्यमंत्री म्हणाले. बीडमधील हत्याप्रकरणात मी खंबीर भूमिका घेतलेली आहे. खंबीर भूमिका घेत असताना त्या माध्यमातून संवाद तोडून टाकायचा



असे करण्याची आवश्यकता नाही, असे ते म्हणाले. धनंजय मुंडे हे देखील राज्याचे मंत्री आहेत, एखादा आमदार एखाद्या मंत्र्याला भेटल्याने कुठलाही फरक पडत नाही, असे देखील मुख्यमंत्री फडणवीस म्हणालेत. सुरेश धस यांनी देखील सांगितले की, भेट घेतली तरी हेतू एकच आहे की सरपंच देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे. तोच हेतू घेऊन सुरेश धस काम करत आहेत. मात्र, काही लोकांच्या पोटात दुखते, त्यामुळे ते यावर टीका करतात, असे ते म्हणाले.सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीबाबत उपमुख्यमंत्री यांनाही प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर बोलताना या भेटीत गैर काय? असा सवाल अजित पवार यांनी केला होता. धनंजय मुंडे मंत्री आहेत. सुरेश धस आमदार आहेत. मुंडे आजारी असल्याने धस यांनी त्यांची भेट घेतली. शेवटी हे राज्य यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांनी चालते. आपल्याला त्यांनी सुसंस्कृतपणाची शिकवण दिली आहे. त्यामुळे कोण कोणाला भेटले यात दुष्मनी पाहायची नसते, असेही ते म्हणाले होते.दरम्यान, धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीनंतर धनंजय देशमुख यांनी थेट गंभीर आणि निर्वाणीचा इशारा दिला आहे. सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीने मनात चलबिचल नाही. गाव आहे, लोकप्रतिनिधी आहेत, या लढ्याला त्यांनी स्वतःच्या अंगावर घेतले आहे. या प्रकरणात कुणीही दगाफटका करू नये, एकही आरोपी सुटता कामा नये ही आमची प्रामाणिक अपेक्षा आहे. एखादा आरोपी सुटणार आहे, असे जेव्हा आम्हाला वाटले. त्यावेळी मी आणि माझे कुटुंब टोकाचे पाऊल उचलणार असल्याचे धनंजय देशमुख म्हणाले.

## भाजपा आ.श्रीजयाताई चव्हाण यांच्या हस्ते दोन युवकांचा सत्कार संपन्न

### निवघा येथील दोन युवकांची एमपीएससी मधुन महसुल सहायक पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

मुदखेड तालुक्यातील निवघा येथील दोन युवकांचा सत्कार सोहळा भाजपा भोकर विधानसभा आमदार श्रीजया ताई चव्हाण यांच्या हस्ते निवघा येथील राजेश विठ्ठराव पवार व साहेबराव बालाजी कानुलकर यांची चझडउमधुन महसुल साहायक पदी नियुक्ती झाल्या बंद्दल सत्कार सोहळा करण्यात आला आमदार श्रीजया ताई चव्हाण यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व तसेच गावकर्योच्या वतीने मोठ सत्कार



सोहळा करुन कौतुक करण्यात आले व त्या वेळी उपस्थीत भाजपा आमादार श्रीजया अशोकराव चव्हाण व बाळासाहेब देशमुख बारडकर उपसरंपच बारड उद्धवराव पवार, कामाजी पवार, विषवनाथ पवार,बालाजी कानगुलकर निवघा सरपंच निवघा प्रभाकर पवार ,विठ्ठल पवार , सचिन पवार, निजाम शेख, व सर्वे गावातील जेस्ट नागरिक व युवा कार्यकर्ते उपस्थित होत.

## डॉ.वनगुजरे यांची विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

डॉ.संतोष वनगुजरे यांची विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर निवड झाल्याची घटना अत्यंत महत्त्वाची आहे.त्यांच्या निवडीमुळे क्रीडा आणि शारीरिक शिक्षण क्षेत्रात नवा आत्मविश्वास निर्माण होईल.डॉ. वनगुजरे यांचा शैक्षणिक आणि क्रीडा क्षेत्रातील अनुभव त्यांना या मंडळावर यशस्वी भूमिका पार पाडण्यासाठी उपयुक्त ठरेल.दि.२३/०१/२०२५ रोजी संपन्न झालेल्या डॉ.बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन



परिषदेच्या बैठकीमध्ये सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी आष्टी येथील अँड.बी.डी.हंबर्डे महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख डॉ.संतोष वनगुजरे यांची क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळावर सदस्य म्हणुन पुढील पाच वर्षासाठी निवड करण्यात आली.मा.कुलगुरू अध्यक्ष असणाऱ्या या समिती मध्ये विद्यापीठ व महाविद्यालयातील क्रीडाविषयक धोरण ठरविणे खेळाडूसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.या समितीतून कार्य केले जाईल.त्यांच्या या यशाबद्दल आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे आदरणीय अध्यक्ष मा.श्री किशोर नाना हंबर्डे सचिव श्री अतुल काका मेहेर डॉ.गणेशजी पिसाळ साहेब श्री दिलीप शेठ वर्धमाने काका डॉ.गायकवाड साहेब प्रा.महेश चवरे सर्व संचालक मंडळ प्राचार्य डॉ सोपानराव निंबोरे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.गजानन सानप डॉ.लांब सर प्राचार्य डॉ.नवनाथ आघव सर डॉ.सचिन कंदले डॉ.सुनील पंढरे डॉ.बापू धोंडे डॉ.डी.के.कांबळे,डॉ.भागचंद सानप डॉ.शंकर धांडे डॉ.राजेश क्षीसागर महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद खेळाडू यांनी अभिनंदन केले.

# देगलूर टाइम्स लाईव्हचे दत्त मंदिरात भव्य शुभारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**

देगलूर शहरातील पवित्र दत्त मंदिरात पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या हस्ते आरती व प्रसाद वाटपाने देगलूर टाइम्स लाईव्ह या डिजिटल माध्यमाच्या शुभारंभाचा सोहळा संपन्न झाला. या वेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.साप्ताहिक देगलूर टाइम्स चे मुख्य संपादक गजानन शेषेराव टेकाळे यांनी मागील दोन वर्षांपासून पत्रकारितेच्या माध्यमातून गोरगरीबांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे कार्य केले आहे. हे कार्य अधिक प्रभावी आणि जलद गतीने होण्यासाठी देगलूर टाइम्स लाईव्ह या डिजिटल प्लॅटफॉर्मची सुरूवात करण्यात आली आहे.या प्रसंगी पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांनी देगलूर





टाइम्स च्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करून नवीन डिजिटल माध्यमासाठी शुभेच्छा दिल्या. समाजातील वंचित घटकांसाठी सातत्याने काम करणाऱ्या या माध्यमाची वाटचाल अधिक यशस्वी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

संपादक गजानन टेकाळे यांनीही गोरगरीब आणि वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी गेली दोन वर्षे आम्ही कार्यरत आहोत. आता हेच कार्य अधिक प्रभावीपणे करण्यासाठी डिजिटल माध्यमातून 'देगलूर टाइम्स लाईव्ह' सुरू केले आहे, असे सांगत समाजहितासाठी सतत कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मारुती मुंडे, दत्त मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा सेवावृत्त सहायक पोलिस निरीक्षक व्यंकटेश रनवीरकर, राष्ट्रवादीचे युवा जिल्हा कार्याध्यक्ष विक्रम नागशेटिवार, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील आणि देगलूर टाइम्स चे कार्यकारी संपादक शेख असलम, संतोष मनधरणे, अनिल पवार, मनोज बिरादार धनाजी जोशी, अमोल कुमारशिंदे, रियाज अत्तार, नागेश पलपवार, गजानन शिंदे आदी उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक गजानन टेकाळे यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद वाघमारे यांनी केले व देगलूर टाइम्स लाईव्ह चे तालुका प्रतिनिधी धनाजी देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.

## सेवानिवृत्त वाहक यांच्या मुलांनी भाजीपाला विकून एमपीएससी मध्ये महसूल सहाय्यक पदी मिळविले यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलुर । मधुकर शिरेवार**

देगलूर – २०२४ मध्ये एमपीएससी परीक्षेमध्ये देगलूर आगारातील सेवानिवृत्त वाहक श्री जी एन कांबळे सर यांचा चिरंजीव नीलकांत गंगाधर कांबळे केदारकुंटेकर यांनी भाजीपाला बाजारात विकून एमपीएससी महसूल सहाय्यक या पदी यांची नियुक्ती झालेली आहे.

सेवानिवृत्त देगलूर आगारातील वाहक श्री जी एन कांबळे सर यांनी आपल्या तीन मुले आणि एक मुलीगी यांना शिक्षण शिकविले आहेत. त्यांची परिस्थिती हालाकीची होती फक्त वाहक या नोकरीवर कुटुंब अवलंबून होते. अशाही परिस्थितीमध्ये आपल्या मुलांचे शिक्षण पूर्ण केले आहे. आणि देगलूर आगार मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानंतर जी एन कांबळे सर यांची सौभाग्यवती शांताबाई जी एन कांबळे यांचे अचानक निधन झाले आहे. अशा वेळी आई सोडून गेल्याचे दुःख स्वतःशी बाळगून आपला अभ्यास सतत





चालू ठेवले आहे. आणि देगलूर बाजारपेठेत भाजीपाला विकून हे यश प्राप्त केले आहे. नीलकांत गंगाधर कांबळे केदारकुंटेकर यांचे खूप खूप अभिनंदन एसटी कर्मचारी करत आहे..!

## बेंबरा शिवारात हल्लर मशीनमध्ये अडकून मजुरांचा दुर्दैवी मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील बेंबरा गावातील एका मजूरदारांनी तूर या पिकाचे गाळण करण्यासाठी शेती कामावर गेला मजूर तुकाराम कांबळे यांच्या गळ्यातील टॉवेल ( मळणी यंत्रण ) हल्लर मशीनमध्ये अडकून मजुरांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बेंबरा शिवारात घडली. तालुक्यातील बेंबरा येथील मजूर तुकाराम रामा कांबळे वय ६० वर्षे हा मयत व्यक्ती गावातीलच अहमद अजमोद्दीन शेख यांच्या हल्लर मशीनवर मजुरीने शेतकरी देवराव ज्ञानेश्वर ठावरे यांच्या शेतातील तूर या पिकाचे गाळण करण्यासाठी मजूरीने गेला असता हल्लर मशीन मध्ये तुरीचे काड टाकत असताना अचानकपणे त्यांच्या गळ्यातील टॉवेल तुरीच्या काडासह हल्लर मशीनने ओढ घेतल्याने त्यांच्या शरीराचा भाग ७५ टक्के हल्लर मशीनमध्ये अडकल्याने तुकाराम कांबळे यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना बेंबरा शिवारात घडलेली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी असा परिवार आहे या परिवारात एकटाच घरातील कमावता करता धरता व्यक्ती असल्याने त्यांचे घर उघड्यावर पडलेले आहे या दुर्दैवी घटनेमुळे त्यांच्या कुटुंबावर डोंगर कोसळला आहे या दुर्दैवी घटनेमुळे बेंबरा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेची माहिती मिळतात मरखेल पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवि हुंडेकर यांनी घटनास्थळी भेट दिली. मयत तकाराम कांबळे यांचा मृतदेह हणेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले शवविच्छेदनानंतर तुकाराम कांबळे यांचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून अंत्यसंस्कार बेंबरा या गावी करण्यात आला.



# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील–आ.विजयसिंह पंडित

## वडगाव (चिखली) येथे १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी प्रामाणिक काम करत भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शेती आणि शेतीशी संबंधित असणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास गेवराई मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी येथे बोलताना व्यक्त केला.

गेवराई तालुक्यातील वडगांव (चिखली) येथे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी भव्य शुभारंभ पार पडला यावेळी ते बोलत होते. यावेळी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रा.काँ.पार्टीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, जेष्ठ कार्यकर्ते भागवतराव काळे, पं.स.सदस्य परमेश्वर खरात, जयसिंग जाधव, प्रा.मुकुंद काळे, ड.सोमेश्वर काळे, राजेंद्र वारंगे , कृ.उ.बा.स संचालक अशोक खरात , सरपंच मच्छिंद्र ढेरे , संपादक अमोल वैद्य, पत्रकार विनोद पौळ, बाळू वारे, तीर्थराज गवारे, ग्रामसेवक राजेंद्र बन, प्रल्हाद यादव, बापूसाहेब हुंबरे, ग्रा.पं. सदस्य अशोक जाधव सह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.पंडित म्हणाले की, मतदारसंघातील अनेक गावांत विविध कामे प्रलंबित आहेत. ती विकास कामे आपल्याला मार्गी लावायची आहेत. राज्यात आपलं सरकार आहे. पाच वर्ष हे सरकार आपलं सरकार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अजितदादा पवार हे आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. त्यामुळे पाच वर्षात जास्तीत जास्त निधी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणून भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला विविध कामे करायची आहेत. शिवछत्र परिवाराबरोबर मायबाप मतदार आणि तरुण कार्यकर्त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला मला साथ दिली. मतदारांच्या खूप अपेक्षा आहेत.



सर्वांच्या अपेक्षा नक्कीच पुर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील असणार आहेत. आपण दिलेले प्रेम हे विसरुन चालणार नाही. हे जे काही ऋण आहे याच्यातनं कधीच उतराई होणार नाही. कारण दहा वर्षापासून शिवछत्र परिवार संघर्ष करतोय आपण ते उद्दिष्ट साध्य केलं ते तुम्ही करुन दाखवलं त्याच्यामुळे याची जाणीव निश्चितपणाने संपूर्ण परिवाराला आहे. तसेच आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि नगरपालिकेच्या निवडणूका होतील यातही शिवछत्र परिवार आपल्या सर्वांच्या सहकार्याने वर्चस्व प्रस्थापित करेल असा विश्वास व्यक्त करुन कार्यकर्त्यांनी यासाठी कामाला लागावे असे आवाहनही शेवटी बोलताना व्यक्त केले. यावेळी परमेश्वर खरात, भाऊसाहेब नाटकर, मुकुंद काळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुभाष औटे, गुलाब औटे, परमेश्वर काळे, माजी सरपंच बबनराव ओटे, नारायण यादव, राजाभाऊ काळे, सुरेश काळे, नकुल औटे, हताम्रध्वज औटे, जिमुरध्वज औटे, श्रीनिवास काळे, महारुद्र काळे, भाऊसाहेब काळे, अशोक काळे, अभिषेक काळे, भारत काळे, महेश औटे, साईनाथ सुरवसे, विष्णू ठोसर, अशोक जाधव, गहणीनाथ शिंदे, अंगद सुपेकर, शिरु वारे, अशोक औटे, बाबूभाई सय्यद, राघू भोसले, प्रल्हाद राऊत, कल्याण धोत्रे, केशव कदम, अण्णासाहेब सुरवसे, देविदास जाधव, अमोल पवार, अमोल पानखडे, अंगद जाधव , रामनाथ यादव, शिवाजी काळे, कालिदास औटे सह चिखली , सुशी, साठेवाडी, कवडगाव येथील ग्रामस्थांसह आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक तथा ग्रा.पं.सदस्य वशिष्ट काळे पाटील, बबन काळे, बाळू भोसले, बाबू औटे, सुनील काळे, सतीश काळे, मंगेश काळे, अमर काळे, प्रशांत काळे, भारत काळे, संदीप काळे, दत्ता सुरवसे सह कार्यक्रमाचे प्रास्ताविक वशिष्ट काळे पाटील यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मयुरध्वज औटे यांनी व्यक्त केले.

## राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी प्रदेश सरचिटणीस गंगाधर भांगे यांचा सहृदय सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र ओबीसी प्रदेश सरचिटणीस गंगाधरराव भांगे हे भोकर तालुक्याच्या दौऱ्यावर आले असता भोकर येथील ओबीसी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संपर्क कार्यालयात त्यांचा शाल पुष्पहार देऊन सहृदय सत्कार करण्यात आला

ओबीसी नेते गंगाधर भांगे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत निर्विरोध निवड झाल्यानंतर ते महाराष्ट्रभर पक्षवाढीसाठी रान उठवून कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत.ते प्रथमच भोकर तालुक्याच्या दौऱ्यावर आले असता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ओबीसी जिल्हाध्यक्ष आनंद डांगे यांच्या संपर्क कार्यालयास भेट देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील ओबीसी कार्यकर्त्यांशी मनमोकळा संवाद साधला. भविष्यात एससी एसटी ओबीसी समाजात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कसे वाढेल यावर चिंतन केले गेले. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी विभागाच्या वतीने आनंद डांगे व कार्यकर्त्यांनी गंगाधर भांगे यांचा जंगी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी त्यांच्या सोबत आलेल्या महीला उपाध्यक्षा स्वरा मराठे व डॉ. श्रीराम तोडके यांचाही समान करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक ता. अध्यक्ष गजु पाटील पोमनाळकर आमित भांगे , आदी सह अनेक कार्यकर्ते उपस्थीत होते.

त्या नंतर पत्रकारांची संवाद साधण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयास भांगे यांनी भेट दिली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सरचिटणीस गंगाधररावजी भांगे यांचा पत्रकार संघाकडून सत्कार करण्यात आला सोबतच महिला जिल्हाउपाध्यक्ष स्वरा मराठे डॉ. तोडके राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा अध्यक्ष नांदेड उत्तर ओबीसी विभाग आनंद डांगे ,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवा तालुका अध्यक्ष गजानन पाटील सोळंके यांचा सत्कार करण्यात आला यावेळी ज्येष्ठ पत्रकार बालाजी नारलेवाड विजय चिंतावार,कमलाकर बरकमकर, राजेश चंद्रे,सुधांशू कांबळे,रमाकांत जोशी, विठ्ठल सुर्लेकर, आदिंची उपस्थित होती.

# सरसम येथे माता भीमाई जयंती उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिमायतनगर । प्रतिनिधी**

हिमायतनगर तालुक्यातील मौजे सरसम ( बु) येथे दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव,विश्वरत्न,बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आई माता भिमाई रामजी आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. सर्वप्रथम माता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमाई स्वयं सहायता बचत समूहाच्या अध्यक्षा कालींदा नारायण वाठोरे या होत्या. यावेळी पत्रकार



विजय वाठोरे यांनी माता भिमाई यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला. यावेळी ते म्हणाले कि पूर्वी शूद्र,अतिशूद्र म्हणून हिणवणाऱ्या समाजाला आज घडीला जे स्वातंत्र्य,समता, बंधुता आणि एवढे सुख सुविधा प्राप्त झाल्या आहेत.त्या फक्त आणि फक्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच झाल्या आहेत आणि या थोर समाजसुधारकाला जन्म देणाऱ्या माता भिमाई यांच्यामुळेच आपल्याला हे सर्व मिळाले आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे पिता रामजी आंबेडकर व त्यांच्या परिवाराला सांभाळणाऱ्या तसेच लेकरा बाळांवर योग्य ते संस्कार करणाऱ्या माता भीमाईच होत्या. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मानंतर अवघ्या पाच वर्षातच त्यांचा मृत्यू झाला.त्यांनी त्यांचे जीवन आंबेडकर घराण्यासाठी अहोरात्र झिजविले.यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जन्म देणाऱ्या भीमाईचे कार्य समाजाने विसरता कामा नये.आजच्या माता माऊल्यांनी माता भीमाईचा आदर्श घ्यावा.यावेळी या कार्यक्रमास रमाई स्वयंसहायता समूहाच्या सचिव रुपाली कांबळे, संघप्रिया कवडे, आम्रपाली नगराळे, माजी सरपंच शेषेकला नगराळे, बालाजी कांबळे, मायावती कांबळे, कमलबाई कांबळे,वंदना नगराळे,संजय वाठोरे, सरस्वताबाई कांबळे, प्रभावती कांबळे,राजू नगराळे, अमन नगराळे,दिशांत कांबळे,दक्ष कवडे यांच्यासह आदीजण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोळवाडी घाटात ६ वाहनांचा एकमेकांना धडकून भीषण अपघात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यात आणि जिल्ह्यात दिवसेंदिवस अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असून, आज दिनांक १६ फेब्रुवारी रोजी सायं ६:१० वाजण्याच्या सुमारास ६ पेक्षा अधिक वाहने एकमेकाला धडकली. या विचित्र अपघातात अनेकजण जखमी झाले आहेत. ट्रक,आयशर टेम्पो, अशोक लेलँड, कार,ऑटो रिक्षा, दुचाकी वाहनाचा अपघातात समावेश असून गंभीर जखमींना उपचारासाठी हलवले आहे. ट्रकमधील हरभरा रस्त्यावर पडल्याने दुचाकीस्वार घसरून पडू लागले. आज सायंकाळी मांजरसुंबा कडून बीड कडे हरभरा घेऊन येणारा कंटेनर कोळवाडी घाटात अचानक समोरील वाहनाने ब्रेक लावल्याने ट्रक,आयशर टेम्पो, अशोक लेलँड, कार,ऑटो रिक्षा ही वाहने एकमेकाला धडकुण विचित्र अपघात झाला. या अपघातात ४ ते ५ जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी बीड शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.मालवाहू ट्रक मधील हरभरा पोते रस्त्यावर पडल्याने काही काळ वाहतूक कोंडी होऊन वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या, तर हरभरा रस्त्यावर पडल्याने दुचाकीस्वार घसरून पडू लागले होते. या अपघाताची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना मिळतात तात्काळ अपघात स्थळी जाऊन वाहतूक सुरळीत केली व रस्त्यावरील हरभरा हटवण्याचे काम सुरु केले.तर काही लोकांनी अंधाराचा फायदा घेऊन हरभऱ्याचे पोते लांबवल्याची माहिती मिळत आहे.जखमींना उपचारासाठी हलविण्यात आलेले आहे. काही काळ ट्रॅफिक झाली होती. वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मदतीला धाऊन आलेल्या लोकांनी व पोलिसांनी वाहतूक सुरळीत केल्याचे कळले आहे.

## अबब...सोने ८७ हजार ९०० पार

# लग्न सराईत वधू पक्षाकडील अडचण ;खरेदी सर्वसामान्य कुटुंबाच्या आवाक्याबाहेर!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

पौष महिन्यात मंदावलेल्या लग्न सराईला माघ महिन्यात वेग आला असून ऐन लग्नसराईमध्ये सोन्याच्या भावाने उचांकी गाठली आहे.सोने प्रतीतोळा ८७ हजार ९०० रूपये पार गेले असून सोने खरेदी सर्वसामान्य कुटुंबाच्या आवाक्याबाहेर गेली आहे. शेतकरी कुटुंबातील लग्न सोहळाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे,

एकीकडे सोयाबीन खरेदीचे हमी भाव केंद्र मुदतीनंतर बंद झाल्यानंतर सोयाबीनचे दर अजून गडगडले आहेत. लग्न सोहळ्यात केवळ नाममात्र मंगळसूत्र खरेदी करून अन्य सोन्याचे दागिन्यांना बगल देण्याचे अनेक सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकाने ठरविले असल्याचे दिसून येत आहे. इच्छा असूनही सोने खरेदी परवडत नसल्याने वधू पक्षाकडील वधूच्या आईचे डोळे पाणावताना दिसून येत आहेत.

कंधार तालुक्यातील अधिक भूभाग डोंगराळ माळरान क्षेत्र असल्याने डोंगरी भागात सिंचनचे प्रमाण अत्यल्प आहे. सिंचन अत्यल्प असल्याने खरीप हंगामातील पिकावर अधिक तर नागरिकांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे.खरीप हंगामात तालुक्यात सोयाबीनचे सर्वाधिक क्षेत्रावर लागवड केली गेली.

५० हजार हेक्टरवर सोयाबीनची लागवड केली आहे.पण सोयाबीनचे दर घसरल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. खरीप हंगामातील सोयाबीनची विक्री काही शेतकऱ्यांनी हमी भावाने शासकीय खरेदी केंद्रावर केली आहे. शासकीय खरेदी केंद्रावरील सोयाबीन खरेदी बंद झाल्यानंतर सोयाबीनचे दर आणखी बाजारात गडगडले आहेत. कंधारच्या बाजारात सोयाबीनचे दर ३ हजार ९९० प्रती क्विंटलवर आले आहेत. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

सुशिक्षित बेरोजगारीचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे.त्यासोबतच जीवनावश्यक वस्तूचे दरही वाढले आहेत.उत्पन्न कमी आणि खर्च अधिक वाढत असल्याने ग्रामीण भागात नागरिक अतिशय काटकसरीने संसाराचा गाडा चालवत आहेत.सोन्याची झळाळीने सर्वांना भुरळ घातली आहे.सोने दागिने परिधान करणे प्रत्येकाचे स्वप्न असते. पण सोन्याचे वाढते दर सर्वसामान्याच्या आवाक्या बाहेर गेले आहेत.सौभाग्याचे लेणे असलेले मनी मंगळसूत्र तरी किमान सोन्याचे असावेत,यासाठी तजवीज करताना सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तींना जिकरीचे झाले आहे.



### आणखी भाववाढीची शक्यता

**लग्न सराईची धूम सुरू असून वधु सह वर पक्षांकडील मंडळीना दागदागिने खरेदी करताना वेळ प्रसंगी कर्ज काढावे लागत आहे.काही सुजाण नागरिक सोन्याचे पॉलिश केलेले दागिने परिधान करण्यासाठी आग्रह करताना दिसून येत आहेत. येत्या काळात सोन्याचे भाव आणखी वाढण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांसह नागरिकही हादरले आहेत. सोन्याच्या झळाळीने चकाकणारे विवाह सोहळ्यावर काहीसा अंकुश बसला आहे. सोने खरेदी परवडत नसल्याने कुटुंबीयांना दहावेळा विचार करावा लागत आहे. सोन्याचे वाढते दराचे परिणाम अन्य वस्तू वर होताना दिसून येत आहेत.**




# निपुण जल्लोष २०२५ महोत्सवातील विजेत्यांचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई | ज्ञानेश्वर उदावंत**





विविध भाषिक, बौद्धिक व शारीरिक स्पर्धाद्वारे स्वः क्षमता सिद्धी,हेचब्रीद प्रत्यक्षात उतवरण्यासाठी २५ प्रकारच्याएफ.एल.एन स्पर्धांचे तालुक्यातील धोंडराई येथे व १८ प्रकारच्याक्रिडा स्पर्धांचेआयोजन गेवराई शहरातील आयटीआय कॉलेज येथील मैदान करण्यात आले होते. या सर्व ५१० विजेत्यांना प्रमाणपत्र व सन्मान चिन्हांचे वितरण गेवराई शहरातील कोल्हेर रोड येथील भाग्यलक्ष्मी लॉन्स येथे शुक्रवार दि.१४ रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विजयसिंह पंडित हे होते . तर प्रमुख पाहुणे म्हणून वासुदेव सांळुके (उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड ), भगवान फुलारी ( शिक्षणाधिकारी प्राथमिक, बीड ) , डॉ विशाल तायडे ( राज्य आंग्लभाषा संभाजीनगर ), रमेश ठाकुर ( सदस्य राज्य कार्यबल गट ), अरुण जाधव ( जि प सदस्य बीड), धनंजय शिंदे ( गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती गेवराई ), वनीता गर्जे (पोलीस उपनिरीक्षक ) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार विजयसिंह पंडित बोलताना प्रथम शिक्षकांनी स्व:योगदातून केलेल्या कार्याचे अभिनंदन व कौतुक केले. मिशन जरेवाडी उपक्रमात गेवराई तालुका सर्वात अग्रस्थानी राहिल असा विश्वास त्यांनी व्यक्त करून गुणवत्तेच्या सार्वत्रिकीकरणासाठी मी सदैव तुमच्या सोबत राहील असा शब्द ही त्यांनी या कार्यक्रम प्रसंगी दिला. निपुण जल्लोष सारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मुलांना खूप मोठी संधी मिळाली. आत्मविश्वास वाढवण्यासाठी व भविष्यातील वाटचालीसाठी सकारात्मक ऊर्जा या कार्यक्रमातून विद्यार्थी व शिक्षकांना प्राप्त झाली असल्याचे सांगितले. या पारितोषिक वितरणा प्रसंगी माजी विद्यार्थी सन्मान सोहळा, परीक्षकांचा आभार सोहळा व पालकांचा कृतज्ञता सोहळा देखील संपन्न झाला. सहभागी पालकांना, माजी विद्यार्थ्यांना व परीक्षकांना प्रमाणपत्र देऊन गौरवान्वीतकरण्यात आले. बौद्धिक, शारिरीक व सांस्कृतिक स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील बहुविध बुद्धिमत्तेचे प्रदर्शन अनुभवता आले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा धोंडराई व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा कन्या धोंडराई यांची अनुक्रमे उच्च प्राथमिक व प्राथमिक गटात निकषांवर आधारित निपुण शाळा म्हणून निवड करण्यात आली.

सर्वाधिक ट्रॉफी मिळवणाऱ्या रोहन शेंडगे व शिवराज कदम या विद्यार्थ्यांची स्टुडन्ट ऑफ द इयर म्हणून निवड करण्यात आली. याप्रसंगी त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. या सोहळ्यासाठी गेवराई तालुक्यातील शिक्षक बांधव अधिकारी वर्ग व पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सई गायके व आर्या चौथाईवाले या विद्यार्थींनीनी केले. कार्यक्रमाचे आभारश्रुती घोडके हीने मानले. हा संपूर्ण सोहळा बीट गेवराई क्रमांक दोन घ्या सर्व शिक्षकांच्या सहकार्य व मार्गदर्शनाखाली संपन्न करण्यात आला.

## उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला पुन्हा नांदेड जिल्हात खिंडार

# युवा जिल्हाप्रमुख गजानन कदम यांच्यासह असंख्य पदाधिकाऱ्यांचा शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड दक्षिण | गोविंद मोरे**



उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला नांदेड जिल्ह्यात पुन्हा एकदा खिंडार पडले आहे. उबाठा मधील बेशिस्तीमुळे आणि निष्क्रियतेमुळे अनेक जणांनी शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र केला असून युवा सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन कदम यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी आज खा.श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे .हा पक्षप्रवेश सोहळा मुंबईत पार पडला. उद्धव बाळासाहेब ठाकरे युवा सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन कदम यांनी स्वबळावर आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवली होती . पक्ष वाढीसाठी वाटेल ते किंमत मोजणाऱ्या गजानन कदम यांना पाठबळ देण्याऐवजी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेतील नेतृत्वाने गजानन कदम यांचे मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही तर पक्षासाठी निष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे जाणीवपूर्वक पाठ फिरवली होती. त्यामुळे पक्षातील बेशिस्त आणि नाकर्तेपणाला कंटाळून अखेर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेतील युवा सेनेचे जिल्हाप्रमुख गजानन कदम यांनी आज मुंबईत खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना नेते माजी मंत्री रामदास कदम, शिवसेना सचिव सिद्धेश भैया कदम आणि विधानसभेच्या उपसभापती नीलम गोरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी युवा सेना विधानसभा प्रमुख सतीश पाटील बाबर , भोकर विधानसभा प्रमुख राजेश डाखोरे , नांदेड उत्तर तालुकाप्रमुख शिवाजी पावडे , मुदखेड तालुका प्रमुख शिवाजी गाडे , अर्धापूर तालुकाप्रमुख दीपक कदम , भोकर तालुकाप्रमुख माधव करेवार , कंधार तालुकाप्रमुख संदीप पाटील , उमरी तालुकाप्रमुख शिवानंद भालेराव , भोकर शहर प्रमुख कृष्णा कुंडलवाड , लोहा शहर प्रमुख गजानन करडे, अर्धापूर शहर प्रमुख बाळासाहेब खराटे , मुदखेड तालुका उपप्रमुख संजय पाटील पांगरगावकर आदींनी मा.एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. गजानन कदम यांच्या शिवसेना पक्षप्रवेशाने नांदेड जिल्ह्यामध्ये युवा सेनेला मोठी बळकटी मिळणार आहे शिवाय असंख्य तरुणही शिवसेनेत प्रवेश करतील असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# महसूल सहाय्यकपदी आदित्य देवकाते यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एम पीएससी) वतीने सन २०२३ मध्ये झालेल्या स्पर्धा परीक्षेतून महाराष्ट्र शासनामध्ये महसूल सहाय्यकपदी निवड झालेल्या आदित्य सुरेश देवकाते रा. मदनवाडी ता इंदापूर जि पुणे येथील रहिवासी आहे बारामती येथे शनिवारी (दि.१५)रोजी सत्कार करण्यात आला. प्रशासनामध्ये काम करीत असताना चुकीचे असे वागू नका,त्यामुळे त्रास होतो. आदित्य देवकातेचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे,आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवकाते वस्ती,भैरवनाथ विद्यालय भिगवण आणि महाविद्यालयीन शिक्षण विद्या प्रतिष्ठान बारामती,ग्रॅज्युएशन बीएससी अग्रिकल्चर हे शरद कृषी महाविद्यालय जैनापुर(कोल्हापूर) येथून केले.माझी नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून महसूल सहायक/लिपिक टंकलेखक या पदी निवड झाली आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास हा बारामतीमध्ये राहूनच केला आहे,कौटुंबिक पार्श्वभूमी सर्वसाधारण मध्यमवर्गीय कुटुंब,वडील मदनवाडी प्राथमिक सहकारी सोसायटीचे सचिव आहेत. आई गृहिणी आहे माझ्या या यशात सर्वात मोठा वाटा हा आई वडिलांचा च आहे त्यांनी मला माझ्या कठीण काळात साथ दिली व अभ्यास करण्यास नेहमी प्रोत्साहित केले तसेच माझे मामा कै. किरण प्रकाश ठेंगल यांचाही माझ्या यशात वाटा आहे. त्याबरोबरच माझ्या प्राथमिक शाळेच्या शिक्षिका सौ.नीलम कोकरे मॅडम तसेच महाविद्यायात जीवनात असणारे शिक्षकवृंद यांचाही मोठा वाटा आहे.कारण लहानपणीच माझ्या शिक्षणाचा पाया या सर्वांनी भक्कम केला.मी खडतर परिस्थितीतून हे यश मिळवले आहे,कारण ग्रामीण भागात असलेल्या सोयीसुविधांचा अभाव तसेच अपुरे मार्गदर्शन असूनही मला हे यश मिळाले आहे.यावेळी किसन नरुटे, बाळासाहेब देवकाते,दत्तू देवकाते,सुरेश देवकाते,महेश हुलगे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# चेहऱ्यावर सतत एलोवेरा जेल चोपडताय ? वाढू शकतात स्किन प्रॉब्लेम्स-डॉ.पल्लवी मेहरे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली | संतोष कदम**

केस आणि त्वचेचे सौंदर्य व आरोग्य चांगले राहावे यासाठी एलोवेरा जेलचा वापर केला जातो. आपल्यापैकी बऱ्याचजणी त्वचेची काळजी घेण्यासाठी एलोवेरा जेलचा वापर करतात. आजकाल अनेक ब्यूटी प्रॉडक्ट्समध्ये तसेच त्वचेसाठी अनेक घरगुती उपाय करताना सर्रास एलोवेरा जेलचा वापर केला जातो.कित्येक प्रकारचे फेसमास्क, फेसपॅक यामध्ये एलोवेरा जेल मिसळून आपण ते त्वचेला लावतो. एवढंच नाही तर काहीवेळा आपण कुंडीतील कोरफडीचे पान कापून थेट त्याचा गर त्वचेवर लावतो.त्वचा आणि केसांच्या अनेक लहान मोठ्या समस्या दूर करण्यासाठी एलोवेरा जेल अतिशय फायदेशीर ठरते खरे पण, सतत त्वचेसाठी एलोवेरा जेलचा वापर करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न काहीवेळा आपल्याला पडतोच. अनेकवेळा आपण त्वचेवरील पिंपल्स, पुरळ किंवा त्वचेच्या इतर समस्या कमी करण्यासाठी एलोवेरा जेलचा वापर करतो. परंतु बरेचदा काहीवेळा गरजेपेक्षा जास्त प्रमाणात एलोवेरा जेलचा वापर केला जातो. ज्यामुळे त्वचेच्या समस्या कमी होण्याऐवजी वाढतात आणि त्या अधिकच त्रासदायक होतात. यासाठीच एलोवेरा जेलचा त्वचेसाठी गरजेपेक्षा जास्त वापर केल्यास काय नुकसान होते याबद्दल ब्यूटी एक्स्पर्टकडून अधिक माहिती समजून घेऊयात.एलोवेरा जेल आवश्यकतेपेक्षा जास्त वापराल तर त्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या उद्भवू शकतात. एलोवेरा जेल मर्यादित प्रमाणात वापरल्यास ते फायदेशीर आहे, परंतु जर तुम्ही ते जास्त प्रमाणात वापरले तर काही मुलींमध्ये त्वचेची ॲलर्जी होऊ शकते. तज्ज्ञांनी पुढे सांगितले की, याचा जास्त वापर केल्याने त्वचेवर खाज सुटणे, जळजळ होणे किंवा काळे डाग देखील पडू शकतात.एलोवेरा जेलचा जास्त वापर केल्याने त्वचेवर त्याचे वाईट परिणाम दिसू शकतात. यामुळे त्वचेच्या समस्या कमी होण्याऐवजी वाढत जातात. जर तुम्ही एलोवेरा जेलचा जास्त वापर केला तर ते तुमच्या त्वचेतील नैसर्गिक तेलाचे प्रमाण वाढवू शकते आणि तुमचा चेहरा चिकट होऊ शकतो. एवढेच नाही तर त्वचेवर जास्त प्रमाणात एलोवेरा जेलचा वापर केल्याने त्वचा काळी पडू शकते आणि त्वचेला कोरडेपणा देखील येऊ शकतो.एलोवेरा जेलचा सतत जास्त वापर केल्यामुळे काहींना लहान वयातच त्वचेवर सुरकुत्या येऊ शकतात. याचबरोबर, जर एलोवेरा जेलचा वापर थोडा जास्त केला तर त्वचेवर मुरुम येऊ शकतात, जे सहज बरे होऊ शकत नाहीत. एलोवेरा जेल वापरण्यापूर्वी, तुम्ही पॅच टेस्ट करावी आणि लक्षात ठेवा की त्याचा जास्त वापर तुमच्या त्वचेला हानी पोहोचवू शकतो, म्हणून ते योग्य प्रमाणात वापरणे चांगले.काही लोकांची त्वचा तेलकट असते. अशा त्वचेला एलोवेरा जेल सूट होत नाही. अशा स्थितीत हे जेल लावल्याने त्वचेला खाज येणे आणि इतर गंभीर समस्या उद्भवू शकतात. हे टाळण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानेच त्वचेला एलोवेरा जेल लावावे.आधीच त्वचेवर खूप डाग व पिंपल्स असतील तर चुकूनही एलोवेरा जेल जास्त लावू नये. यामुळे त्वचेला खाज आणि ॲलर्जी होऊ शकते.

# बालकांचा सर्वांगीण विकास ही काळाची गरज-गटविकास अधिकारी सचिन खुडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर | बबनराव धायतोंडे**





एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत इंदापूर प्रकल्प दोन बीट भिगवण अंतर्गत येणाऱ्या सर्व अंगणवाड्यांचा एकत्रित आरंभ पालक मेळावा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पळसदेव ता.इंदापूर येथे आयोजित करण्यात आला होता.या आरंभ मेळाव्याचे उद्घाटन इंदापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी केले.

प्रतिमा पूजन इंदापूर बालविकास प्रकल्प अधिकारी अमोल मेरगळ,पंचायत समिती सदस्य बाळासाहेब काळे,पळसदेवचे सरपंच अंकुश जाधव आदिंसह उपस्थित पदाधिकारी यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना गटविकास अधिकारी सचिन खुडे म्हणाले की राष्ट्रीय पोषण अभियान २०२५ अंतर्गत राबवण्यात येणारे अशा प्रकारचे आरंभ पालक मेळावे महत्वाचे असुन पालक कुटुंब व समुदायाचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे.० ते ३ वर्ष बालकांचा सर्वांगीण विकास ही काळाची गरज आहे.त्याकरिता राबविण्यात येणारे खेळ कृती व प्रेमाचा स्पर्श आदी विधायक कार्यक्रम उपयुक्त ठरत आहेत.

त्याकरिता ० ते ३ वर्षापर्यंत बालकांचा विकास कशा प्रकारे करावा याविषयी पालकांना माहिती देण्याकरिता विविध स्टॉल्स लावण्यात आले होते.सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी या उपक्रमाची उत्कृष्ठ तयारी केली होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका तांबोळी मॅडम यांनी केले.यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी अमोल मेरगळ व पळसदेवचे सरपंच अंकुश जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.सुनीता बनसुडे व सुनंदा पोंदकुले यानी स्वागतगीत तर माळेवाडी येथील अंगणवाडीतील मुलींनी सुंदर गीत सादर केले.बेटी बचाव बेटी पढाओ असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.शाळेने विशेष सहकार्य केल्याबद्दल बापु आदलिंग यांचा सत्कार करण्यात आला.मेळावा यशस्वितेसाठी अंगणवाडी सेविका,मदतनीस यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी इंदापूर गटविकास अधिकारी सचिन खुडे,बालविकास प्रकल्प अधिकारी अमोल मेरगळ,विलास बंडगर, रोहीत निकत,पळसदेवचे उपसरपंच कैलास भोसले,सदस्य अजिनाथ पवार, मेघराज कुचेकर,महेंद्र काळे,विकास शिंदे,शहा भाभी,भुजबळ मॅडम आदिंसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष हेगडे यांनी केले,तर आभार बापू आदलिंग यांनी मानले.

# हणेगाव जिल्हा परिषद शाळेतील वर्ग खोली बांधकामांचे उद्घाटन - सरपंच सौ.शारदादेवी राठोड यांच्या हस्ते

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर | जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील हाणेगाव येथील जिल्हा परिषद हायस्कूल वर्ग खोली बांधकामांचे उद्घाटन सरपंच सौ शारदादेवी राठोड यांच्या हस्ते करून बांधकाम चालू करण्यात आले आहे. जिल्हा परिषद हायस्कूल शाळा ही सर्वात जुनी असून जवळपास ७०- ८० वर्षापुर्वीची असल्याने अनेक वर्ग खोल्या मोडकळीस आलेल्या आहेत या जुनाट खोल्या मुळे विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात येण्याचे नाकारता येत नाही. या शाळेतील वर्ग खोलीकडे विध्यार्थी पालक, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ शारदादेवी राठोड, उपसरपंच पटेल मुजीपोद्दीन चमकुडे शिष्टमंडळाने वारंवार शाळेतील वर्ग खोलीचे अवस्था पाहून शासनाकडे पाठपुरावा करून निदर्शनास आणून दिल्यानंतर नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.मिनलताई करणवाल व सौ.बिरगे ताईच्या वतीने शाळेस ३ वर्ग खोल्या मंजूर करून निधी उपलब्ध करून दिल्याने दोन्ही अधिकाऱ्यांचे गावकऱ्यांच्या वतीने शब्द सुमनाने हस्त मुखी अभिनंदन होते असल्याचे दिसून येत आहे.या माध्यमातून तात्काळ वर्ग खोली बांधकाम चालू करण्यात आले आहे व तसेच या बांधकामा बरोबर शाळेचा परिसर स्वच्छ असावे, गैर प्रकार घडू नये जुगार खेळणे,दारू पिणे,गुटखा तंबाखू चे सेवन करणे अशा गोष्टी दिवसेंदिवस वाढत चालल्याने ग्रामपंचायतच्या माध्यमातून सी.सी. टी. व्ही.बसविण्यात आले असल्याने गावातील शिक्षण प्रेमी व विद्यार्थी पालकांकडून समाधान व्यक्त होत आहे. या शाळेतील वर्ग खोलीच्या बांधकाम उद्घाटन कार्यक्रमासाठी माजी सरपंच प्रशांत देशमुख,प्राचार्य शंकरराव राठोड,माजी पं.स.सदस्य हज्जु सेठ चमकुडे,जिल्हा परिषद बांधकाम विभाग उप अभियंता शिंदे, ग्रा.पं. सदस्य दिलीप बंदखडके,ग्राम विस्तार अधिकारी अमोल जाधव, उमाकांत पंचगल्ले.शिवकांतआप्पा माळगे,वसंत आडेकर,भीमशक्ती सामजिक संघटनेचे किशोर आडेकर,मुख्याध्यापक गालचेलवार,सह शिक्षक दिलीप वाडीयार,सामाजिक कार्यकर्ते यादव सूर्यवंशी,हारून कोटग्याळे, मुबीन शेख सर व इतर मान्यवर गावकरी वर्ग उपस्थित होते.



# जिल्हा परिषद शाळा गोलेगाव येथे बाल आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांच्या व्यवहार ज्ञानाला चालना





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली | संतोष कदम**

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारिक ज्ञानाचीजोड त्यांच्या आयुष्यातील व्यवहाराला उभारी देत असते.निपुण भारत अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोलेगाव येथे बाल आनंद बाजार व खाऊ गल्ली या उपक्रमांतर्गत व्यावहारिक जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव मुलांनी घेतला. शाळेत भाजी बाजार व खाऊ गल्ली उपक्रमातून कृतीयुक्त शिक्षण देण्याचा प्रामाणिक प्रयत्न शाळेने केला. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या शेतातून तसेच खरेदी करून वेगवेगळ्या वस्तू विक्रीसाठी आणल्या होत्या. गावच्या इतिहासात असा भाजी बाजार व खाऊ गल्ली उपक्रम प्रथमच भरविला असल्याचे येथील ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचा सर्व माल खरेदी केला. आपणही व्यवहार करू शकतो असा आत्मविश्वास मुलांना मिळाला. बाजारातच खरेदी करून नफ्यावर विक्री करण्याचे व्यापारी गणित येथील मुलांनी यशस्वीपणे सोडविण्याचे पाहून शिक्षक आनंदित झालेले दिसले. या उपक्रमाचे उद्घाटन फीत कापून गावचे प्रथम नागरिक सरपंच दिपालीताई तुषार पडवळ यांनी केले. याप्रसंगी उपसरपंच निलेशशेठ बांदल, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मच्छिंद्रशेठ कारंडे, पोलीस पाटील संदीप भोगावडे, पीडीसीसी बँक मॅनेजर शरद भोगावडे, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा सीमा वाखारे, सीमा ढेपे, सदस्या पुनम भोगावडे, प्रियंका कु-हाडे, आरती मांढरे, सदस्य गोरक्ष कारंडे, उद्योजक तुषारशेठ पडवळ, नितीन पडवळ, स्वप्निल पडवळ, बबनराव वाखारे, माजी सरपंच राजेंद्र कटके, सरस्वतीताई कटके, तुळशीराम पवार, सचिन कटके, दीपक भोगावडे, अंगद वाखारे, शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक विशाल वाखारे, मच्छिंद्र गायकवाड, सोनवणे सर, दीपक मांढरे, दत्ता साळवे, सुहास गोगडे, संदीप कु-हाडे तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने खरेदीसाठी उपस्थित होता.खाऊ गल्लीसाठी विद्यार्थी व ग्रामस्थांच्या उड्या पडल्या होत्या. वस्तूंच्या विक्रीतून पैसे मिळत असल्याचे पाहून विद्यार्थी हरकून गेले होते. मात्र त्याचबरोबर दहा रुपये कमवण्यासाठी माझा आई-बाबा शेतामध्ये किती राबतो... तसेच पदार्थ बनविण्यासाठी आईला किती कष्ट पडत असतील. याची जाणीवही त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. सदर उपक्रमातून सर्वसाधारणपणे २५ ते ३० हजारांची उलाढाल झाली असे मुख्याध्यापक संदीप आढाव यांनी सांगितले.

# मातंग समाज महाअधिवेशनाला अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे विकास परिषदेचा जाहीर पाठिंबा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी | किशन गायकवाड**


१ मार्च २५ रोजी लहु शक्ती सेनेच्या वतीने पुणे येथे संध्याकाळी सहा वाजता मातंग समाजाचे महा अधिवेशन आयोजित करण्यात आले असून महाराष्ट्र राज्यांचे मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी लहु शक्ती सेना प्रमुख विष्णूभाऊ कसबे राहाणार आहेत. हे महा अधिवेशन मातंग समाजाला अ ब क ड वर्गीकरण करून आरक्षण मिळावे यासाठी आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात संपूर्ण महाराष्ट्रातुन लाखोंच्या संख्येने समाज बांधव उपस्थित राहणार आहेत. सदरील अधिवेशनात उमरी तालुक्यातुन सुध्दा समाजभूषण किशनदादा गायकवाड कुदळेकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्ते सहभागी होणार असून अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य भारतीय जनता पार्टीचे समाजभूषण किशनदादा गायकवाड कुदळेकर यांनी तामसा ता हादगाव येथील बैठकीत लहु शक्ती सेनेचे प्रदेश अध्यक्ष कैलासदादा कंधारे, जिल्हा अध्यक्ष प्रदीप वाघमारे इत्यादीची भेट घेऊन अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे विकास परिषदेचा जाहीर पाठिंबा दिला आहे.अशी माहिती अनुसूचित जाती मोर्चा भाजपाचे उमरी तालुकाध्यक्ष रवींद्र गायकवाड कुदळेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# चंद्रकांत साबळे यांची शिवजयंती उत्सव समिती अध्यक्षपदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**

दि.१५ फेब्रुवारी रोजी सिंदखेड राजा येथील शासकीय विश्रामगृहामध्ये मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक अशोक राजे जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवजयंती उत्सव समिती ची बैठक पार पडली,या बैठकीत सर्वानुमते शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिवाजीराजे जाधव (मा. पंचायत समिती सभापती सिंदखेड राजा) यांनी अध्यक्ष पदासाठी नाव सुचवले असता चंद्रकांत साबळे (मा उपनगराध्यक्ष सिंदखेड राजा) यांची शिवजयंती उत्सव समिती अध्यक्षपदी निवड करण्यात आली, या प्रसंगी, मधुकर गव्हाड जिल्हा परिषद सदस्य, सतीश काळे,राजु



आढावा माजी नगरसेवक, नानाभाऊ ठाकरे, डॉ. कळकुंबे मा. अध्यक्ष शिवजयंती उत्सव समिती, शिवा दादा पुरंदरे जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण वि सेना, डॉ. बुरकुल, डॉ. कींगर, डॉ. मुरकुट, शिवाजी गव्हाड, दीपक कींगरे, ड. अतुल हाडे, अँडोकेट ठोसरे, मानवतकर,नीकस ,अतिश राजेजाधव, गोविंद टेके छावा जील्हाउपाध्यक्ष, बाळासाहेब शेळके छावा विधासभा अध्यक्ष, नीतीन शेळके, शिवाजी शेळके, विजय कुहीरे, शिवाजी कुहीरे,नंदु खांडेभराड ,सागर खांडेभराड,वैजनाथ कुडे मा सरपंच, शिवेंद्र पडोळे,डीगंबर शिंदे,एकनाथ म्हस्के, अर्जुन जाधव,बाबासाहेब पुरंदरे यांच्या सह मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

# दौंड तहसील कार्यालयात आज लोकशाही दिनाचे आयोजन

## नागरिकांनी लोकशाही दिनामध्ये सहभागी होण्याचे अवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

दौंड तहसील कार्यालयात सोमवारी (दि.१७) लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे,त्याबाबत तहसीलदार अरुण शेलार यांनी माहिती दिली.लोकशाही दिनानिमित्त तहसील कार्यालयात दौंड तालुक्यातील सर्व शासकीय विभागाचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थिती राहणार आहेत. नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी व नागरिकांना शासन दरबारी येणाऱ्या अडीअडचणी व विविध विभागांसंबंधी असलेल्या तक्रारीचे यावेळी निराकरण करण्यात येणार आहे.

तसेच डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर अँग्रिकल्चर अंतर्गत अग्रीस्टॅक शेतकरी आयडी तयार करून देणे, शिधापत्रिका विषयक ई-केवायसी करणे, विशेष अर्थसाहाय्य योजनांबाबत ई-केवायसी करणे,आयुष्यमान भारत योजनेकरिता नोंदणी करणे आदी सुविधा देखील नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नागरिकांनी या लोकशाही दिनात सहभागी होऊन आपल्या अडचणींचे निराकरण करून घ्यावे,असे आवाहन दौंडचे तहसीलदार अरुण शेलार यांनी केले आहे.



# १५ वर्षानंतर मित्रांचा स्नेहमेळावा-साने गुरुजी विद्यालयाच्या २००८-०९ बॅचचा गेट-टुगेदर संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर | विष्णू मोहन पोले**

येस्तार (ता. ) - तब्बल १५ वर्षानंतर साने गुरुजी विद्यालय, येस्तार येथील इयत्ता दहावी २००८-०९ बॅचचे विद्यार्थी एकत्र आले आणि स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने जुन्या आठवणींना उजाळा दिला. हा गेट-टुगेदर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी साने गुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक तुमराम सर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दयानंद



बिरादार सर आणि दिलीप बनसोडे सर उपस्थित होते. तसेच विवेकानंद मठपती सर, शेटकार सर, पास्टे मॅडम आणि वाडीकर मॅडम यांचीही विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित वर्गमित्रांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा दिला. विविध मनोरंजक ॲक्टिव्हिटीज आणि गप्पांच्या माध्यमातून जुन्या दिवसांचा आनंद घेण्यात आला. राजू नरवटे, परमेश्वर ढाकणे, कृष्णा पोले, सुरेखा कराड, संगीता केंद्रे, ज्योती राजपांगे, नीता राजपांगे, मनीषा काळे, सोनाली ढाकणे, अविनाश ढाकणे, सत्यवान मुंडे, रामकिशन लिमले, अजय ढाकणे, पुरुषोत्तम ढाकणे, गिरी हेमलता, साईनाथ मुसळे, मंगेश मुसळे, अर्जुन चव्हाण, शीतल चव्हाण, पत्रकार विष्णू पोले, भरत ढाकणे, ज्ञानेश्वर ढाकणे आणि अनिल ढाकणे, सुनील आरदवाड आदी वर्गमित्र या सोहळ्यास उपस्थित होते.या गेट-टुगेदरमुळे सर्वांनी पुन्हा एकदा शालेय जीवनाच्या आठवणीत रमण्याचा आनंद घेतला. उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी पुढील वर्षीही असा मेळावा आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त केला.



तामसा येथील लहु शक्ती सेना बैठकीत किशनदादा गायकवाड कुदळेकर संस्थापक अध्यक्ष अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे विकास परिषद तथा प्रदेश कार्यकारिणी निमंत्रीत सदस्य भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश, रविंद्र गायकवाड कुदळेकर उमरी तालुका अध्यक्ष भाजपा अनुसूचित जाती मोर्चा.(लोकनेता न्युज नेटवर्क उमरी)

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904